लोकमत पू. पान क्र. 2



रस्ता रुंदीकरणानंतर सुशोभीकरणाचे काम केल्याने येथील रस्ता अरुंद झाला असून रेल्वे स्थानक परिसरात वाहतूककोंडी नित्याचीच झाली आहे.

# भाईंदर रेल्वे स्थानक परिसरात वाहतूककोंडी

## बेकायदा रिक्षांसह फेरीवाल्यांचा विळखा

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा-भाईंदर महापालिका आणि तत्कालीन लोकप्रतिनिधी यांच्या दांडगाईमुळे भाईंदर पश्चिम रेल्वे स्थानकाबाहेर सुशोभीकरणाच्या नावाखाली केलेले भलेमोठे बांधकाम हे कायमच्या वाहतूककोंडीस कारणीभूत ठरले आहे. बेकायदा रिक्षांचा आणि फेरीवाल्यांच्या विळख्यामुळे जाचात मोठी भर पडली आहे.

भाईंदर रेल्वे स्थानकाच्या पश्चिम बाजूला भाईंदर पश्चिमसह थेट मुर्धा ते उत्तन-चौक आणि पुढे गोराईपर्यंतच्या नागरिकांचे येणे-जाणे असते. त्यामुळे येथे मोठ्या संख्येने रिक्षा असतात. शिवाय एमबीएमटी, एसटी, बेस्ट आदी परिवहन उपक्रमाच्या बस मोठ्या संख्येने असतात. त्याशिवाय खासगी वाहनांची येथून ये-जा असते. त्यामुळे हा परिसर मोठ्या वर्दळीचा असतो.

येथील वाहतूककोंडी आणि रस्त्यावरील रिक्षा स्टँड, बसस्थानक पाहता महापालिकेने येथील काही जुनी बांधकामे तोडून आधी रुंदीकरण केले. त्यामुळे वाहतूककोंडी कमी होऊन नागरिकांनाही काहीसा दिलासा मिळाला होता, असे येथील नागरिकांचे म्हणणे आहे.

### रस्ता-परिसर अरुंद

या सुशोभीकरणाच्या कामामुळे येथील रस्ता व परिसर अरुंद झाला असून पालिकेने तर भररस्त्यात रिक्षांच्या तीन लाईन लावून दिल्या आहेत. शिवाय एसटी बस रस्त्यात थांबवाव्या लागतात. बेशिस्त रिक्षाचालक हे लाईन व्यतिरिक्त रिक्षा उभ्या करून वाहतूक कोंडीत आणखी भर घालतात. या भागात बेकायदा फेरीवाल्यांचा सुळसुळाट पालिकेच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या भ्रष्ट आशीर्वादाने वाढला आहे.

### दररोज मरणयातना

करोडोंचा खर्च करून अनावश्यक आणि अवाढव्य करून ठेवलेले सुशोभीकरण हे महापालिका आणि तत्कालीन सत्ताधारी यांचे हे पाप आहे. यांच्या पापाच्या मरणयातना रोज सामान्य नागरिकांना भोगाव्या लागत आहेत. रोज वाहतूककोंडी आणि वाहनांच्या गर्दीतून जीव सांभाळत मार्ग काढावा लागतो आहे. पालिका अधिकाऱ्यांवर कारवाई केली पाहिजे.

- महेश चव्हाण, नागरिक

लोकमत पू. पान क्र. 3

# न्यायालयाच्या इमारतीत चोरट्यांनी मारला डल्ला

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा रोडमधील न्यायालयाची इमारत तयार झाली आहे. न्यायालय अजून सुरू झाले नसले तरी चोरट्यांनी न्यायालयाच्या इमारतीत डल्ला मारत तब्बल २२ नळ आणि ॲल्युमिनियमच्या पट्ट्या चोरून नेल्या. याप्रकरणी २२ ऑक्टोबर रोजी मीरा रोड पोलिस ठाण्यात गुन्हा दखल करण्यात आला आहे.

मीरा-भाईंदरच्या न्यायालयाची इमारत विविध कारणांनी रडतखडत का होईना पूर्ण झालेली आहे. कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीअभावी अजून न्यायालय सुरू झालेले नाही. शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे टेक्निकल असिस्टंट कल्पेश पाटील यांच्या फिर्यादीवरून मीरा रोड पोलिस ठाण्यात अनोळखी चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



### नळ, ॲल्युमिनियम पट्ट्यांची चोरी

नवीन न्यायालय इमारतीतील ५२ हजार ८०० रुपये किमतीचे २२ नळ आणि ४ हजार रुपये किमतीच्या ॲल्युमिनियम पट्ट्या ऑक्टोबर २०२३ ते २० ऑक्टोबर २०२४ या काळात चोरीला गेल्या आहेत. मीरा रोड पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, वरिष्ठ पोलिस निरीक्षक चंद्रकांत सरोदे यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार गिरामे हे तपास करत आहेत. नळ व ॲल्युमिनियम पट्ट्यांसह येथील काही इलेक्ट्रिकल सामानही चोरीला गेल्याचे सूत्रांनी सांगितले.

CamScanner
Scanned with OKEN Scanner

पुण्यनगरी पु. पान क्र. 4

# नालासोपाऱ्यात मुख्य रस्ता क्रेन, बस पार्किंगला आंदण

## वाहतूक कोंडीने नागरिकांचे हाल

। वसई : नालासोपारा पश्चिमेकडील मुख्य रस्त्याचा एक पदर क्रेन, तर दुसरा खाजगी बसच्या पार्किंगला बहाल करण्यात आली. यामुळे दररोज वाहतूक कोंडीत अडकून पडण्याची पाळी नागरिकांवर येत आहे. त्यातून रुग्णवाहिकाही सुटलेल्या नाहीत. नालासोपारा समेळपाडा ते रेल्वे स्थानक असा मुख्या रस्ता सहापदरी आहे. वाढती लोकसंख्या आणि वाहनांचा विचार करुन या रस्त्याचे रुंदीकरण करण्यात आले होते. त्यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले असतानाच, या रस्त्याच्या दुतर्फा एकेक पदर बेकायदा पार्किंगने हडप केला. पोलीस स्थानका लगत असलेल्या या रस्त्यावर दररोज सायंकाळी अनेक भल्यामोठ्या क्रेन पार्क करुन ठेवल्या जातात. आवश्यकता भासल्यावरच त्यांची हलवा हलव केली जाते.

तर दुसऱ्या बाजूला खाजगी ट्रॅव्हलच्या मिनी बसेस दिवसभर ठाण मांडून उभ्या असतात. हे कमी की काय म्हणून उरलेला रस्ता अनधिकृत फेरीवाले आणि आईस्क्रीम पार्लरच्या गाड्यांनी गडप केला जातो. त्यामुळे सायंकाळी कामावरून आपल्या दुचाकीने घरी परतणाऱ्या नागरिकांना या रस्त्याच्या वाहतुकीत अडकून पडावे लागते. या रस्त्यावरील श्रीप्रस्थ चौकात कोणताही वाहतुक पोलीस तैनात करण्यात आलेला नाही.



त्यामुळे वाहतुकीचे सर्व नियम पायदळी तुडवून वाहने हाकण्याचा प्रयत्न केला जातो. त्यातून होणाऱ्या वाहतूक कोंडीत रुग्णवाहिका, शाळेच्या बसेस अडकून पडीत आहेत. या बेकायदा पार्किंगकडे वाहतूक पोलीस आणि महापालिकेने जाणीव पुर्वक दुर्लक्ष केले आहे. दुसरीकडे कामानिमित्त किंवा औषध खरेदी करण्यासाठी पाच मिनिटे दुचाकी उभ्या करणाऱ्यांवर वाहतूक पोलिसांकडून दंडात्मक कारवाई केली जात आहे

पुढारी पान क्र. 5

# खून करून १६ वर्षांपासून फरार असलेल्या आरोपीला अटक

**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

आचोळे, नालासोपारा पुर्व येथे अग्नीशस्त्राने गोळीबार करून खून करणाऱ्या व १६ वर्षापासून फरार असलेल्या आरोपीला मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेने भदोही, उत्तरप्रदेश येथून अटक केली आहे.

नालासोपारा पोलिस ठाणे हद्दीतील आरपीआय युवा कार्यालय, आचोळे येथे १९ जानेवारी २००९ रोजी फिर्यादी लालचंद जैस्वाल, मयत प्रविण प्रभाकर धुळे व साक्षीदार असे नमुद कार्यालयात बसले असताना आरोपीने कारमधुन येवून पुर्व वैमनस्यातुन मयत प्रविण धुळे याला कार्यालयाचे बाहेर बोलावून हाताने, दगडाने, विटाने मारहाण केली. यावेळी फिर्यादी व साक्षीदार हे सोडवण्यास गेले असता त्यांनाही मारहाण केली. आरोपी सिकंदर इम्रान शेख व अनिल दुर्वी सिंग यांनी पिस्टलमधुन मयत प्रविण धुळे याला गोळ्या घालुन जिवे ठार मारले. याप्रकरणी नालासोपारा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. या गुन्हयाच्या तपासात २०११ मध्ये १२ आरोपींना अटक करुन त्यांचे विरुध्द दोषारोपपत्र सादर करण्यात आले होते. परंतु पाहीजे आरोपी झुरी ऊर्फ विनोद सिंह हा गुन्हा दाखल झाले पासुन पोलीसांना मिळुन येत नव्हता. वरीष्ठ अधिकाऱ्यांनी गंभीर व संवेदनशील गुन्हयातील पाहीजे आरोपीचा शोध घेण्याचे आदेश दिले होते. या गुन्हयातील पाहीजे आरोपी झुरी ऊर्फ विनोद सिंह याचा यापूर्वी सगळीकडे शोध घेऊन देखील तो गेल्या १६ वर्षापासुन मिळुन येत नव्हता. त्याअनुषंगाने मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी राहुल राख यांनी सपोनि दत्तात्रय सरक, पोहवा. शिवाजी पाटील, पोहवा, गोविंद केंद्रे असे तपास पथक तयार केले. या पोलीस पथकाने या गुन्हयाची नालासोपारा पोलीस ठाणेतुन माहीती घेतली परंतु पाहीजे आरोपी याचे फक्त झुरी ऊर्फ विनोद सिंह नांव निष्पन्न होते. पाहीजे आरोपीचे पूर्ण नांव, गांवाचा पत्ता व सद्याचा पत्ता मिळून येत नव्हता. आरोपी गांव अछवर, बाना ज्ञानपुर, जनपद भदोही, उत्तरप्रदेश असे असल्याचे निष्पन्न केले. आरोपी हा त्याचे मूळ गांवी असल्याची शक्यता असल्याने लगेच पोलीस पथक वरीष्ठांच्या परवानगीने आरोपीचे मुळ गांवी जावून त्याच्या गावात असल्याची माहीती मिळाली. ज्ञानपुर पोलीस ठाणे, भदोही, उत्तरप्रदेश या स्थानिक पोलीस ठाण्याचे मार्फत शिताफीने साफळा लावून त्याला त्याच्या राहते घरातून ताब्यात घेण्यात आले. आरोपीला ट्रान्झीस्ट रिमांड घेण्यात आले आहे.

CamScanner
Scanned with OKEN Scanner

पुढारी पान क्र. 5

# अखेर त्या गिफ्ट वाटपाविरोधात गुन्हा दाखल

## आ. गीता जैन यांचा नातेवाईक सुनील जैनवर गुन्हा

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

मिरा-भाईंदर विधानसभा मतदार संघावर दावेदारी करणाऱ्या आ. गिता जैन यांच्या एका कार्यक्रमात रिक्षा चालकांना गिफ्ट देऊन त्यांना आपल्यालाच मते देण्याचे आवाहन आ. जैन यांच्याकडून करण्यात आले. यात जैन यांनी आचारसंहितेचा भंग केल्याचे स्पष्ट झाल्यानंतरही निवडणूक प्रशासनाकडून त्याची दखल घेतली गेली नाही. त्यावर चर्चा सुरु होताच निवडणूक प्रशासनाकडून तब्बल चार दिवसांनी मंगळवारी रात्री ११.३० वाजता जैन यांचे नातेवाईक व कार्यक्रमाचे आयोजक सुनील जैन यांच्याविरोधात भाईंदर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हा कार्यक्रम सुनील जैन यांनी रुद्र फाऊंडेशनच्या माध्यमातून १९ ऑक्टोबर रोजी भाईंदर पश्चिमेकडील अग्रवाल ग्राऊंड येथे शहरातील रिक्षा चालकांच्या स्नेहसंमेलन या सांस्कृतिक कार्यक्रमासाठी आयोजित केला होता. तसे त्यांनी ग्राऊंड बुकिंग करतेवेळी दिलेल्या पत्रात नमूद केले आहे. तत्पूर्वी आ. गिता जैन यांचा फोटो असलेली पोस्ट व्हायरल करून त्यात रिक्षा चालक, मालकांसाठी स्नेह भोजन व गिफ्ट देण्यात येणार असल्याचा संदेश लिहिण्यात आला होता. यानुसार शहरातील अनेक रिक्षा चालकांनी कार्यक्रमाला हजेरी लावली होती. त्यावेळी गिता जैन यांनी उपस्थित रिक्षा चालकांना यंदाच्या निवडणुकीत आपल्यालाच मते देण्याचे आवाहन केले होते. त्याचा व्हिडीओ समाज माध्यमांवर व्हायरल करण्यात आला होता. मात्र त्याची उपरती होताच हा तात्काळ व्हिडीओ डिलीट करण्यात आला. तर कार्यक्रमात उपस्थित रिक्षा चालकांना जैन यांचा फोटो असलेल्या पॅकिंगमध्ये जेवणाच्या डब्यांचे गिफ्ट तसेच रिक्षावर चिकटविण्यासाठी स्टिकरचे वाटप करण्यात आले. त्याची व्हिडीओ क्लिप समाजमाध्यमांवर व्हायरल झाल्यानंतरही आचारसंहितेचा भंग केल्याप्रकरणी निवडणूक प्रशासन व पोलिसांनी त्याची दखल घेतली नाही.

याच दिवशी कार्यक्रम संपल्यानंतर सायंकाळी ६.३० वाजता निवडणूक भरारी पथक क्रमांक ५ चे प्रमुख गिरीश संखे यांनी पथकातील लिपिक राजेश चव्हाण यांना संपर्क साधुन रुद्र फाऊंडेशनने आयोजित केलेल्या कार्यक्रमात आचारसंहितेचा भंग झाल्याची पोस्ट समाजमाध्यमांवर व्हायरल होत असून संबंधित ठिकाणी जाऊन खात्री करावी व पुढील कारवाई करावी, असे निर्देश दिले. यानंतर चव्हाण यांनी सायंकाळी ७ वाजताच्या सुमारास कार्यक्रमाच्या ठिकाणी जाऊन खात्री केली असता त्याठिकाणी कोणताही आचारसंहितेचा भंग झाला नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यानंतरही त्यांनी भाईंदर पोलीस ठाण्यात सोपस्कार म्हणून कार्यक्रमाचे आयोजक सुनील जैन यांच्यावर गुन्हा दाखल केला. वास्तविक कार्यक्रमाच्या ठिकाणी नियमप्रमाणे पोलीस व निवडणूक प्रशासनाकडून कार्यक्रमाचे चित्रीकरण होणे अपेक्षित असताना त्याला बगल देत कार्यक्रम संपल्यानंतर आचारसंहिता भंगाचे संशोधन निवडणूक प्रशासनाकडून करण्यात आल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

### मतदारांमध्ये संभ्रम निर्माण

आचारसंहितेचा भंग झाल्याची पोस्ट जतीन दधीच या व्यक्तीने कार्यक्रमाच्या दिवशी दुपारी २ वाजता व्हायरल केल्यानंतरही कार्यक्रम समपल्यानंतर भरारी पथक त्याठिकाणी गेल्याने संभ्रम निर्माण झाला आहे. तसेच याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याबाबत निवडणूक निर्णय अधिकारी सुनील भुताळे यांनी पोलीस ठाण्याला दिलेल्या पत्रात आ. गिता जैन यांच्या कार्यक्रमात आचारसंहितेचा भंग केल्याचे निदर्शनास येऊन याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत. असे असतानाही भरारी पथकाने सोईप्रमाणे कार्यक्रम संपल्यानंतर त्याठिकाणी जाऊन आचारसंहितेचा भंग झाल्याचे निदर्शनासच आले नसल्याचा कांगावा केल्याने मतदारांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.

CamScanner
Scanned with OKEN Scanner

पुढारी पु. पान क्र. ३

# रस्त्यावरील उडणाऱ्या धुळीमुळे अपघातांची शक्यता

## क्षमतेपेक्षा अधिक मालाची वाहतूकही धोकादायक

**खानिवडे : पुढारी वृत्तसेवा**

धुळीने भरलेला माल आच्छादित न करता क्षमतेपेक्षा अधिक मालाची धोकादायक वाहतुक सुरूच असून यामुळे त्या वाहनांमधून एकसंघ नसलेला माल पडून आधीच खड्डे पडलेल्या व तात्पुरती डागडुजी केलेल्या रस्त्यावरील उडणाऱ्या धुळीमुळे इतर वाहनांचे चालक आणि प्रवाश्यांसह रस्त्याच्या कडेने रहिवाशी बेजार झाले आहेत. या धुळीमुळे नागरिकांचे आरोग्य ही धोक्यात आले आहे.

वसई-विरार यासह विविध ठिकाणी विकासकामे वेगाने सुरू झाली आहेत. त्यामुळे बांधकाम व मातीभराव यासाठी लागणारे माती, दगड, राडारोडा, खडी, ग्रीड पावडरची भुकटी यासह इतर साहित्याची वाहतूक सुरू झाली आहे. मात्र या मालाची वाहतूक क्षमतेपेक्षा अधिक भार घेऊन होत असल्याने अपघात होण्याचा धोका निर्माण होत आहे.

एकसंध नसलेला माल हा बंदिस्त करून वाहतूक करणे गरजेचे असताना नियमबाह्य पद्धतीने ही वाहतूक होत आहे. त्यामुळे त्यातून रस्त्यावर धुळीकण पडून प्रदूषण निर्माण होऊ लागले आहे. याशिवाय काही वेळा हे धुळीकण हवेद्वारे वाहनांच्या मागून येणाऱ्या वाहनचालकांच्या डोळ्यात उडत आहे.



### नियमांचे उल्लंघन करून वाहतूक सुरूच

माती भराव व इतर साहित्य वाहतूक करणारे मोठं मोठे हायवा ट्रक हे बेदरकारपणे चालविले जाऊ लागले आहेत. काही ट्रक तर नियमबाह्य व वाहतूक नियमांचे उल्लंघन करून चालविले जात आहेत. काही ट्रकला ब्रेक लाईट नाही, रेडियम नाही, खीळखिळी झालेली वाहने रस्त्यावर चालविली जात असल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. केवळ हफ्ते देऊन अशी वाहने सुरू ठेवली जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

अशा घटना टाळण्यासाठी मागे काही महिन्यांपूर्वी उपप्रादेशिक परिवहन विभागाने वायूवेग पथके तयार केली होती. तरीही वसई-विरारमध्ये महामार्गासह इतर ठिकाणच्या रस्त्यावर धोकादायक वाहतूक सुरूच असल्याचे चित्र दिसून येत आहे.

यात मुंबईचा वसईच्या महामार्गासह इतर प्रमुख रस्त्यांच्या कडेला दिसणारा राडारोडा आता गावागावातील मोकळ्या जागांवर आणि अंतर्गत रस्त्यांवर रात्रीच्या निवांत वेळी बिनधास्तपणे फेकून अवजड ट्रक नेऊन पोबारा करून घाणीचे साम्राज्य उभे करत आहेत. ती घाण भर रस्त्यात पसरून त्याची धूळ तयार होते व ती देखील वेगवान वाहनांच्या वर्दळीत उडून धुळीचे साम्राज्य पसरते.परिवहन विभागाने अशा धोकादायक पध्दतीने होणाऱ्या वाहतुकीवर निर्बंध घालण्यासाठी रात्रीच्या सुमारास पथके नेमून कारवाई करावी अशी मागणी नागरिकांनी केली आहे. याबाबत एकसंध नसलेल्या मालाच्या वाहतुकीवर कारवाया सुरूच आहेत. काही भागात नजर चुकवून असे प्रकार होत असतील तर त्यावर सुद्धा कारवाई करू असे परिवहन विभागाने सांगितले आहे.

CamScanner

Scanned with OKEN Scanner

सामना पान क्र. 7

# कर्मचारी प्रशिक्षणास गैरहजर असलेल्या २४९ शिक्षकांवर कारवाईचा बडगा

**भाईंदर** - विधानसभा निवडणूक आचारसंहिता दरम्यान कर्मचारी प्रशिक्षणास गैरहजर असलेल्या २४९ शिक्षकांवर मीरा-भाईंदर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. निवडणुकीच्या कामकाजात टाळाटाळ करणाऱ्या या शिक्षकांना पकडून तत्काळ मीरा-भाईंदर १४५ मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांसमोर हजर करण्याचे आदेश सहाही पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकांना दिले आहेत.

१४५ मतदारसंघातील निवडणुकीचे काम करण्यासाठी विविध शाळांमधील ३६८ शिक्षकांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. निवडणूक प्रक्रियेच्या प्रशिक्षणासाठी उपस्थित राहण्याचे आदेश शिक्षकांना बजावण्यात आले होते, परंतु सदर कर्मचारी प्रशिक्षणादरम्यान काशिमीरा येथील १३२ पैकी १२८, नयानगरमधील २०, नवघर येथील ६३ पैकी ६१, उत्तन येथील ११, भाईंदर येथील ३० पैकी २९, मीरा रोडमधील ११२ शिक्षक गैरहजर होते. त्यामुळे गैरहजर असलेल्या २४९ शिक्षकांना कोणत्याही परिस्थितीत हजर करण्याचे आदेश निवडणूक निर्णय अधिकारी सुनील भुताळे यांनी पोलिसांना दिले आहेत.

### भाईंदरमध्ये आचारसंहितेची ऐशी की तैशी

# भाजप आमदार गीता जैन यांच्या भावासह जिल्हाध्यक्षावर गुन्हा

**भाईंदर** - विधानसभा निवडणुकीत मतदारांना आकर्षित करण्यासाठी भाजपवाल्यांकडून आचारसंहितेची ऐशी की तैशी झाल्याने निवडणूक आयोगाची डोकेदुखी वाढली आहे. आमदार गीता जैन यांचा मावसभाऊ सुनील जैन यांनी रिक्षाचालकांना टिफिन बॉक्सचे वाटप केले आहे, तर नरेंद्र मेहता यांचे समर्थक भाजपचे जिल्हाध्यक्ष किशोर शर्मा यांनी कोणतीही परवानगी न घेता मीरा रोड येथील सेंट्रल पार्कमध्ये कार्यक्रम घेतला आहे. या दोन्ही प्रकरणात भाईंदर आणि मीरा रोड पोलीस ठाण्यात आचारसंहिता भंगाचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

आमदार गीता जैन यांचे मावसभाऊ आणि रुद्र फाऊंडेशनचे अध्यक्ष सुनील जैन यांनी रिक्षाचालकांना टिफिन बॉक्सचे वाटप केले. त्यानंतर त्या ठिकाणी आलेल्या रिक्षांवर 'सक्षम मीरा-भाईंदर की एक ही पुकार फिर एक बार गीता आमदार, पाच साल सुख-शांती और चैन फिर एक बार गीता भरत जैन', असे मजकूर असलेले पोस्टर्स लावले. भाजप जिल्हाध्यक्ष किशोर शर्मा यांनी मीरा रोडच्या एस.के. स्टोन येथील सेंट्रल पार्क येथे भाजपचे माजी आमदार नरेंद्र मेहता यांच्या समर्थनात लाडकी बहीण योजनेचा कार्यक्रम घेतला. मात्र या कार्यक्रमाला परवानगी नव्हती.

CS CamScanner
Scanned with OKEN Scanner

लोकसत्ता पु. पान क्र. 1

# अखेर खासगी बसगाड्यांच्या वाहनतळाचे दर निश्चित

लोकसत्ता वार्ताहर

**भाईंदर :** भाईंदर पश्चिम येथील सुभाषचंद्र बोस मैदानाजवळ रस्त्याच्याकडेला खासगी बसगाड्यांना उभे राहण्यासाठी महापालिकेने वाहनतळाची उभारणी केली आहे. या ठिकाणी वाहने उभी करण्याचे दर निश्चित करण्यात आले आहेत. तसा प्रशासकीय ठराव पालिकेने मंजूर केला आहे.

मिरा-भाईंदर शहराचे नागरीकरण झपाट्याने वाढत आहे. या सोबत वाहनांची संख्या बेसुमार वाढली आहे. वाहने उभी करण्यासाठी जागा अपुरी असल्याने कोणत्याही ठिकाणी वाहने उभी केली जात होती. भाईंदर शहरात रस्त्याच्याकडेला खासगी बसगाड्या उभ्या करण्यात येतात. अरुंद रस्त्यावर उभ्या गाड्यांमुळे वाहतूक कोंडी होते. त्यामुळे बसचालक शहरातील अंतर्गत रस्त्यावर तसेच एकांत जागेत या बसगाड्या उभ्या करत आहेत. मात्र त्या ठिकाणी युवक सिगरेट व मद्यसेवन करत असल्याचे दिसून येतात. चार वर्षांपूर्वीच भाईंदर पश्चिम येथील जय अंबे नगर परिसरात एका बस चालकाने चार वर्षीय चिमुकलीचे अपहरण करून लैंगिक अत्याचार केल्याची घटना घडली होती. त्यामुळे खासगी बसगाड्यांच्या वाहनतळाला नियंत्रणात आणण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत होती. त्यावरून भाईंदर पश्चिम येथील सुभाषचंद्र बोस मैदानाजवळ उभ्या राहणाऱ्या वाहनांवर लक्ष ठेवण्यासाठी सुरक्षारक्षक आणि हायमास्ट दिवा लावण्याचे आदेश आयुक्त संजय काटकर यांनी विभाग अधिकाऱ्यांना दिले आहेत. याठिकाणी उभ्या वाहनांकडून वाहनतळ शुल्क वसुल करण्याचे धोरण तयार करण्याचे आदेश वाहन विभागाला देण्यात आले होते. त्यानुसार जागेचा आढावा घेतल्यानंतर २६ बसगाड्या उभ्या राहणाऱ्याची क्षमता असल्याचे समोर आले. प्रतिवाहन मासिक ४०० रुपये आणि १८ टक्के जीएसटी शुल्क निश्चित करून सदर जागेत चार कर्मचारी तैनात करण्याचा प्रशासकीय ठराव मंजूर केला आहे.

## वाहतूक विभागाची मंजुरी नाही

**भाईंदर पश्चिम येथील सुभाषचंद्र बोस मैदानाजवळील रस्त्यावर वाहनतळ उभारण्याच्या पालिकेच्या निर्णयास वाहतूक पोलिसांचे ना हरकत पत्र मिळण्याबाबत प्रशासनाने ९ ऑक्टोबर रोजी पत्रव्यवहार केला होता. मात्र यावर वाहतूक पोलिसांनी उत्तर दिले नसल्याचे नमूद करत प्रशासकीय ठराव मंजूर करण्यात आला आहे.**

### शुल्क किती?

| वाहन प्रकार | ६ तास | १२ तास | २४ तास | मासिक |
|---|---|---|---|---|
| लहान व अवजड | ७० | १२५ | १७५ | ४०० |

# अल्पवयीन मुलीवर सामूहिक अत्याचार

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**वसई :** नालासोपाऱ्यात आणखी एक सामूहिक अत्याचाराची घटना उघडकीस आली आहे. १६ वर्षांच्या मुलीवर तिच्या वर्गमित्रासह दोघांना धमकावून अत्याचार केला तसेच तिची अश्लील छायाचित्रे काढून तिला धमकावले आहे. याप्रकरणी नालासोपारा पोलिसांनी मंगळवारी दोन अल्पवयीन मुलांवर गुन्हा दाखल केला आहे.

ऑगस्ट महिन्यात पीडित मुलीचा १६ वर्षांचा वर्गमित्र तिला निळेमोरे येथील एका मित्राच्या घरी घेऊन गेला होता. तेथे तिला फूस लावून त्या दोघांनी तिच्यावर अत्याचार केला. त्यानंतर दोघांनी पुन्हा तिला धमकावून निळेमोरे येथे बोलावून तिच्यावर अत्याचार केला. एका आरोपीने चित्रिकरण केले. त्या आधारे दोन्ही तिला धमकावत होते. याप्रकरणी पीडित मुलीच्या आईने मंगळवारी नालासोपारा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. एक आरोपी १६ तर दुसरा आरोपी १७ वर्षांचा आहे.

# रुग्णाच्या मृत्यूप्रकरणी नातेवाईकांचा गोंधळ

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**वसई :** शासकीय रुग्णवाहिका उशिरा आल्याने मृत्यू झाल्याचा आरोप करत त्या व्यक्तीच्या नातेवाईकांनी संताप व्यक्त करत पोलीस चौकीबाहेरच गोंधळ घातला. बुधवारी सकाळी ११ च्या सुमारास नालासोपारा पूर्वेच्या प्रगतीनगर पोलीस चौकीबाहेर ही घटना घडली.

प्रगतीनगर येथील शिवसमर्थ अपार्टमेंध्येमध्ये गोपी विश्वकर्मा (५७) कुटुंबियांसमवेत राहत होते. ते मधुमेहाने आजारी होते. बुधवारी सकाळी ८ च्या सुमारास त्यांची तब्येत अचानक खालावली. कुटुंबियांनी १०८ क्रमांकावर संपर्क साधून रुग्णवाहिका मागवली. मात्र ती उशिरा आली. रुग्णवाहिका स. १०.३० वा. आली तोपर्यंत विश्वकर्मा यांचा मृत्यू झाला होता. कुटुंबियांनी मृतदेह रुग्णवाहिकेतून पोलीस चौकीत नेला आणि गोंधळ घातला. पोलिसांनी मध्यस्ती करून जमावाला शांत केले. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवून दिला. विश्वकर्मांचे निवासस्थानापासून शासकीय रुग्णालय एक किमी लांब आहे. रुग्णवाहिका उशिरा आली तरी रिक्षा किंवा अन्य खासगी वाहनाने त्यांना रुग्णालयात नेणे आवश्यक होते, असे पोलिसांनी सांगितले.

CamScanner
Scanned with OKEN Scanner

लोकसत्ता पु. पान क्र. 4

# मिरा-भाईंदरमध्ये ५७ अर्जांचे वाटप

**लोकसत्ता वार्ताहर**





**भाईंदर :** आगामी विधानसभा निवडणुकीची उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाले. मिरा-भाईंदर १४५ विधानसभा मतदार संघात मागील दोन दिवसात ५७ उमेदवारी अर्जांचे वाटप करण्यात आले आहे.

राज्यातील विधानसभा निवडणुकीसाठी २२ ऑक्टोबरपासून अर्ज दाखल करण्यास सुरुवात झाली. त्यानुसार मागील दोन दिवसांत एकही अर्ज दाखल झालेला नाही. मात्र २५ इच्छुक उमेदवारांनी ५७ अर्जांची खरेदी केली आहे. यात आमदार गीता जैन यांनी ३ अर्ज घेतले आहेत. मविआकडून माजी आमदार मुझफ्फर हुसेन यांनी काँग्रेस उमेदवार म्हणून अर्ज घेतला. भाजपकडून अॅड. रवी व्यास, सुरेश खंडेलवाल, चंद्रकांत मोदी, रविंद्र जैन यांनी अर्ज घेतले आहेत. शिवसेना (शिंदे) पक्षाकडून माजी नगरसेवक विक्रम प्रताप सिंह आणि त्यांची पत्नी निशा सिंह यांनी अर्ज घेतले आहेत. त्याचप्रमाणे विक्रम यांनी अपक्ष म्हणून अर्ज घेतला आहे. याशिवाय राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाकडून आसिफ शेख आणि रमजान खत्री यांनीही उमेदवारी अर्ज घेतले आहेत. राष्ट्रवादी (शरद पवार) पक्षाचे बाबुराव शिंदे यांनी अपक्ष म्हणून अर्ज घेतल्याची नोंद आहे. आरपीआयकडून अर्चना कोहली चक्रे तर बहुजनकडून विजय सातोस्कर यानी अर्ज घेतला आहे. याव्यतिरिक्त अर्ज घेणाऱ्यांमध्ये माजी नगरसेवक हंसूकुमार पांडे, सचिन घरत, जय शंकर सिंह तसेच अन्य अपक्ष उमेदवारांचा समावेश आहे.

## आमदार गीता जैन यांच्या अर्जाची चर्चा

**मिरा-भाईंदर १४५ विधानसभेच्या जागेवरून महायुतीमध्ये शिवसेना-भाजपमध्ये रस्सीखेच सुरू आहे. तसेच जैन यांना उमेदवारी मिळण्याची शक्यता अधिक असली तरी माजी आमदार नरेंद्र मेहता यांच्या दाव्यामुळे, काही भाजपच्या कार्यकर्त्यांचा त्यांना विरोध सुरू आहे. परिणामी महायुतीकडून इच्छुक असलेल्या आमदार गीता जैन यांनी उमेदवारी अर्ज घेताना भाजप, शिवसेना व अपक्ष म्हणून नोंद केली आहे. त्यामुळे गीता जैन या भाजप अथवा शिवसेना (शिंदे) किंवा अपक्ष म्हणून लढणार असल्याचे स्पष्ट झाल्याने शहरात चर्चांना उधाण आले आहे.**

यांचे नाव निश्चित मानले जात असून भाजपने नालासोपारामधून राजन नाईक यांना उमेदवारी जाहीर केली आहे. येत्या काही दिवसांत उमेदवारी निश्चित केली झाल्यानंतर बंडखोरी करणारे उमेदवार, इतर लहान पक्ष व अपक्ष उमेदवार अर्ज दाखल करतील, अशी अपेक्षा आहे.

# वसई, नालासोपाऱ्यात ३२ नामनिर्देशन पत्रांचे वाटप

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई :** विधानसभा निवडणुकीसाठी मंगळवारपासून नामनिर्देशन अर्जांचे वाटप सुरू करण्यात आले आहे. वसई विधानसभा क्षेत्रातून १८ तर नालासोपारा विधानसभा क्षेत्रातून १४ अशा ३२ नामनिर्देशन पत्रांचे वाटप करण्यात आले आहे. दोन्ही विधानसभा क्षेत्रात अद्याप एकही उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला नाही. अखेरच्या क्षणी अधिक अर्ज दाखल होण्याची शक्यता आहे.

विधानसभा निवडणुकीचे बिगूल वाजले असून निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पडावी यासाठी प्रशासन सज्ज झाले आहे. मंगळवारपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात झाली आहे. तहसीलदार कार्यालय व महापालिकेच्या ठिकाणी तयार करण्यात आलेल्या निवडणूक कार्यालयात १३३ वसई व १३२ नालासोपारा मतदारसंघाचे उमेदवारी अर्ज स्वीकारले जाणार आहेत. त्यामुळे या परिसरात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला. खासगी वाहनांना प्रवेश बंद करण्यात आला आहे.

या दोन्ही मतदारसंघात निवडणूक अतिशय चुरशीची होणार आहे. त्यामुळे इच्छुकांनी विधानसभा निवडणूक कार्यालयातून नामनिर्देशन पत्र घेऊन जाण्यास सुरुवात केली आहे.

## इच्छुकांची कोंडी

**नालासोपारा मतदारसंघातून महायुतीने राजन नाईक तर मनसेने विनोद मोरे यांची उमेदवारी जाहीर केली आहे. वसई विधानसभा क्षेत्रातून बहुजन विकास आघाडीकडून स्वतः हितेंद्र ठाकूर हे रिंगणात उतरणार आहेत. मात्र महाविकास आघाडी व अन्य पक्ष यांची उमेदवारी अजूनही निश्चित झाली नाही. वसई, नालासोपारा या मतदारसंघात कोणकोणत्या उमेदवारांना संधी मिळणार हे अस्पष्ट आहे. त्यामुळे उमेदवारी अर्ज भरण्यास शेवटच्या क्षणाची वाट पाहावी लागणार असल्याचे चित्र दिसून येत आहे.**

CamScanner
Scanned with OKEN Scanner

लोकसत्ता पृ. पान क्र. ३

# 'मधुजाला'त अडकवून वृद्धाची ३४ लाखांची लूट

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** एका वृद्धाला 'मधुजाला'त (हनी ट्रॅप) अडकून अश्लील चित्रफितीच्या आधारे त्याच्याकडून तब्बल ३४ लाख रुपये उकळल्याचा प्रकार नालासोपारा येथे उघडकीस आला आहे. याप्रकरणी आचोळे पोलीस ठाण्यात एका तरुणीसह तिघाविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नालासोपाऱ्याच्या आचोळे परिसरात राहणारे तक्रारदार हे ६९ वर्षांचे असून सेवानिवृत्त आहेत. २८ एप्रिल रोजी त्यांना 'कुटुंब' नावाच्या ॲपवरून प्रियांका शर्मा नावाच्या तरुणीने संपर्क साधला होता. प्रियांकाने तक्रारदाराला मधाळ बोलण्यात गुंतवून मधुजालात (हनीट्रॅप) अडकवले. तिने स्वत:ची अश्लील चित्रफित पाठवली आणि तक्रारदाराला देखील आपली चित्रफित पाठविण्यास सांगितले. त्यानुसार तक्रारदाराने प्रियांका नावाच्या तरुणीला आपली चित्रफित पाठवली होती. यानंतर मात्र प्रियांकाने तक्रारदाला ब्लॅकमेल करण्यास सुरुवात केली. चित्रफित डिलीट करायची असेल तर पैसे द्यावे लागतील असे तिने सांगितले. घाबरून त्यांनी प्रियांकाचा नंबर डिलीट करून तिला ब्लॉक केले.

प्रियांकाचा नंबर ब्लॉक केल्याने हे प्रकरण शांत झाले, असे तक्रारदाराला वाटले. मात्र लगेच त्यांना रामकुमार मल्होत्रा नावाच्या इसमाचा फोन आला. दिल्ली गुन्हे शाखेतून बोलत असल्याचे त्याने सांगून हे प्रकरण मिटविण्यासाठी पैशांची मागणी केली. एप्रिल ते सप्टेंबर या कालावधीत त्यांनी तक्रारदाराकडून ३४ लाख रुपये उकळले. हे पैसे तक्रारदाराने ऑनलाइन पाठवले होते. मात्र तरी देखील या भामट्यांची पैशांची मागणी वाढत होती. अखेर तक्रारदाराने आचोळे पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. एप्रिलपासून हा फसवणुकीचा प्रकार सुरू होता. याप्रकरणी आम्ही प्रियांका शर्मा, रामकुमार मल्होत्रा आणि राहुल शर्मा या तीन जणांविरोधात गुन्हे दाखल केले आहेत, अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार यांनी दिली.

म. टा. पृ. पान क्र. १

# नालासोपाऱ्यात मोरे, भाईंदरमध्ये राणे

**म. टा. वृत्तसेवा, वसई-भाईंदर**

## मनसेचे उमेदवार जाहीर

नालासोपारा मतदारसंघातून भाजप, बहुजन विकास आघाडीच्या उमेदवाराची घोषणा झाल्यानंतर आता मनसेनेदेखील आपल्या उमेदवाराची घोषणा केली आहे. नालासोपारा विधानसभा मतदारसंघासाठी विनोद मोरे यांना मनसेने उमेदवारी जाहीर केली आहे. तर मिरा-भाईंदर मतदारसंघासाठी संदीप राणे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.

नालासोपारा मतदारसंघ हा पालघर जिल्ह्यातील सर्वाधिक मतदार असलेला विधानसभा मतदारसंघ आहे. या मतदारसंघात ५० टक्के परप्रांतीय मतदारांचा समावेश आहे. या ठिकाणचे विद्यमान आमदार असलेले बहुजन विकास आघाडीचे क्षितिज ठाकूर हेच मागील तीन टर्म येथील आमदार आहेत. यावेळच्या चौथ्या टर्मसाठीदेखील बहुजन विकास आघाडीतर्फे त्यांची उमेदवारी नुकताच जाहीर करण्यात आली आहे. तर दुसरीकडे भाजपतर्फे माजी जिल्हाध्यक्ष राजन नाईक हे निवडणुकीच्या रिंगणात आहेत. तर यावेळी पूर्ण ताकदीने मनसे निवडणुकीच्या रिंगणात उतरली आहे. संदीप राणे मागील वर्षभरापासून मनसेचे जिल्हाध्यक्ष म्हणून भाईंदरमध्ये काम पाहत आहेत.

CamScanner
Scanned with OKEN Scanner

N. B. T. पान क्र. 6

## नाबालिग से दुष्कर्म

■ निसं, नालासोपारा: नालासोपारा पश्चिम में रहने वाली 16 वर्षीय किशोरी के साथ अगस्त में दो नाबालिग लड़कों ने दुष्कर्म किया था। मामला सामने आने के बाद पीड़िता की शिकायत पर मंगलवार को पुलिस ने विभिन्न धाराओं के तहत मामला दर्ज कर लिया है। आरोपी भी पीड़िता के स्कूल में पढ़ते हैं। अगस्त में लड़की को इन लोगों ने अपने घर बुलाया था, जहां दुष्कर्म करने के बाद मोबाइल में अश्लील विडियो बना लिया। उसे ब्लैकमेल कर रहे थे। फिलहाल पुलिस ने दोनों के खिलाफ रेप और पॉक्सो ऐक्ट के तहत केस दर्ज किया है।

## अभिनेत्री के साथ बलात्कार

■ निसं, वसई: नायगांव पुलिस स्टेशन क्षेत्र में रहने वाली 24 वर्षीय टीवी ऐक्ट्रेस ने आरोप लगाया कि एक शख्स ने उससे शादी का झांसा देकर बलात्कार किया है। पीड़ित युवती की शिकायत पर पुलिस ने विभिन्न धाराओं के तहत मामला दर्ज कर लिया है। सितंबर 2023 में उसकी पहचान आरोपी से हुई थी। वह पहले से ही शादी शुदा था। उसने कहा कि उसका पत्नी से तलाक हो रहा है। वह उससे शादी करेगा।

**सितंबर 2023 में आरोपी से पहचान हुई थी**

## गांजा तस्करी मामले में तीन आरोपी अरेस्ट

■ निसं, वसई: वसई पूर्व स्थित सातीवली इलाके में गांजा की तस्करी के मामले में नारकोटिक्स विभाग ने तीन लोगों को गिरफ्तार किया है। इनके पास से चार किलो गांजा जब्त किया गया है, जिसकी कीमत 2 लाख 40 हजार रुपये बताई गई है।

**एनसीबी ने किया चार किलो गांजा जब्त, 2. 40 लाख रुपये कीमत**

मीरा भाईंदर-वसई विरार आयुक्तालय की एनसीबी टीम को सूचना मिली थी कि सातीवली में कुछ लोग गांजा की खेप के साथ आ रहे हैं। टीम ने जिलेदार राम विश्वास पटेल, सुनील कुमार रमेश कुमार रजक और विनोद प्रमोद कुशल को हिरासत में लेकर तलाशी ली। इस दौरान चार किलो गांजा बरामद हुआ। सभी को गिरफ्तार किया गया है। आरोपी नालासोपारा के संतोष भुवन के निवासी हैं।

N. B. T. पान क्र. 5

## छह लाख रुपये की बिजली चोरी, पुलिस कर रही जांच

■ निसं, नालासोपारा: बिजली विभाग के अधिकारी की शिकायत पर तुलिंज पुलिस स्टेशन में एक व्यक्ति के खिलाफ बिजली चोरी का मामला दर्ज किया गया है। नालासोपारा पश्चिम के उमराले गांव में आरोपी के खिलाफ 2022 से ही चोरी की बिजली इस्तेमाल करने के आरोप हैं। बिजली विभाग को लगभग छह लाख रुपये का आर्थिक नुकसान हुआ है। बिजली विभाग के अधिकारी भरत दुधावडे को सूचना मिली थी कि उमराले गांव निवासी डॉमनिक जोसेफ लुस पिछले दो साल से चोरी की बिजली इस्तेमाल कर रहा है। मंगलवार को टीम ने छापा मारा और जांच में पाया कि 22,513 यूनिट बिजली चोरी की गई है। फिलहाल पुलिस मामले की जांच कर रही है।

## नालासोपारा में भीषण आग, सामान जलकर खाक

■ निसं, नालासोपारा: नालासोपारा पूर्व में आचोले रोड पर स्थित डॉनगली में बुधवार की रात 9 बजे एक डेकोरेटर की दुकान में भीषण आग लग गई, जिससे परिसर में अफरा-तफरी मच गई। सूचना मिलते ही मौके पर पहुंची फायर ब्रिगेड की तीन गाड़ियों ने एक घंटे की कड़ी मशक्कत के बाद आग पर काबू पा लिया। इस आगजनी में कोई जनहानि नहीं हुई है, लेकिन दुकान में रखा लाखों रुपये का सामान जलकर खाक हो गया। फायर ब्रिगेड के अधिकारियों के अनुसार, आग के कारणों का पता नहीं चल सका है।

CamScanner
Scanned with OKEN Scanner

नवभारत पु. पान क्र. 3

### गैरहाजिर रहने वाले स्कूल के शिक्षकों को हाजिर करने का आदेश

# चुनाव अधिकारी ने पुलिस को लिखा पत्र

## 9 स्कूलों के 132 शिक्षक, कर्मचारियों की नियुक्ति

■ **मीरा-भाईंदर, (सं).** 145 मीरा-भाईंदर विधानसभा चुनाव की प्रक्रिया सफलता पूर्वक संपन्न कराने के लिए नियुक्त गैरहाजिर रहने वाले विभिन्न स्कूल के शिक्षकों को पकड़ कर हाजिर करने का आदेश चुनाव निर्णय अधिकारी सुनील भूताले ने संबंधित पुलिस थानों के पुलिस निरीक्षक को दिया है. 15 अक्टूबर को चुनाव आयोग ने महाराष्ट्र के विधानसभा चुनाव 2024 की अधिकृत घोषणा की. चुनाव प्रक्रिया के लिए जिलाधिकारी व जिला चुनाव अधिकारी ठाणे के आदेश पर शहर के 28 स्कूलों के 368 शिक्षकों और कर्मचारियों की नियुक्ति आदेशित किया था. साथ हीं उन्हें 20 अक्टूबर को मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी द्वारा भारतरत्न लता मंगेशकर नाट्य गृह में आयोजित प्रथम प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित किया था. जिसमें विभिन्न स्कूलों के 349 शिक्षक ,कर्मचारी अनुपस्थित थे. प्रशिक्षण कार्यक्रम में अनुपस्थित रहने वालों को हाजिर करने के लिए चुनाव निर्णय अधिकारी भूताले ने पुलिस को पत्र लिखा है.मीरा-भाईंदर शहर के काशीमीरा पुलिस थाना अंतर्गत स्थित 9 विभिन्न स्कूलों के 132 शिक्षक, कर्मचारियों की नियुक्ति चुनाव प्रक्रिया में हिस्सा लेने के लिए की गई उसमें से 128 अनुपस्थित रहे, नयानगर पुलिस थाना अंतर्गत स्थित 3 स्कूल के 20 शिक्षकों में से 20 अनुपस्थित, नवघर पुलिस थाना अंतर्गत स्थित 6 स्कूल के 63 शिक्षकों में से 61 अनुपस्थित, उत्तन सागरी पुलिस थाना अंतर्गत स्थित 1 स्कूल के 11 में से 11 शिक्षक अनुपस्थित, भाईंदर पुलिस थाना अंतर्गत स्थित 6 स्कूल के 30 में से 29 अनुपस्थित और मीरा रोड पुलिस थाना अंतर्गत स्थित 3 स्कूलों के 112 में से 100 शिक्षक ,कर्मचारी अनुपस्थित रहे.



# सिर्फ एक परिवार का हुआ विकास

## वसई-विरार शहर का नवी मुंबई की तर्ज पर होगा डेवलपमेंट

■ **नालासोपारा, (सं).** बुधवार को नालासोपारा पहुंचे भाजपा नेता किरीट सोमैया ने नालासोपारा विधानसभा 132 के भाजपा उम्मीदवार राजन नाईक से मुलाकात कर उन्हें जीत की अग्रिम बधाई दी. उन्होंने कहा कि, इस चुनाव में हम लड़ेंगे और राजन नाईक को विधायक बनाएंगे. ऐसा हम सिर्फ इसलिए कह रहे हैं, क्योंकि पूरा एमएमआर हम अपने कब्जे में लेने वाले हैं. क्योंकि हम इस वसई-विरार को नवी मुंबई की तर्ज पर डेवलप करने वाले हैं. हमें यहां की गुंडागर्दी को समाप्त करनी है. लोकसभा चुनाव में भाजपा नालासोपारा विस क्षेत्र में 70 हजार मतों से आगे थी, लेकिन इस विस चुनाव में हम 70 नही बल्कि 72 हजार मतों से जीत हासिल करेंगे. उन्होंने कहा कि वसई-विरार में क्षेत्र का नही बल्कि सिर्फ एक परिवार का विकास हुआ है.



CamScanner
Scanned with OKEN Scanner

दैनिक भास्कर पान क्र.4

# प्रवीण धुले हत्याकांड: फरार आरोपी 16 साल बाद गिरफ्तार

**भास्कर संवाददाता | विरार**

नालासोपारा में प्रवीण धुले हत्याकांड मामले में पुलिस ने एक फरार आरोपी को 16 साल बाद उत्तर प्रदेश के भदोही जिले से गिरफ्तार किया है। आरोपी अलग-अलग राज्यों में नाम और पहचान बदलकर रहता था। आरोपी की पहचान विनोद कुमार बुधीराम सिंह उर्फ झुरी के रूप में हुई है। पुलिस अधिकारी ने बताया कि 19 जनवरी 2009 में आरपीआई के युवा नेता प्रवीण धुले की कार्यालय के बाहर गोली मार कर हत्या की गई थी। इस मामले में पुलिस ने 12 आरोपियों को गिरफ्तार कर अदालत में उनके खिलाफ चार्जशीट दायर की थी। लेकिन इस मामले में विनोद कुमार बुधीराम सिंह उर्फ झुरी पुलिस को चकमा देकर फरार हो गया था। मीरा भायंदर-वसई-विरार पुलिस आयुक्तालय की स्थापना के बाद पुलिस कमिश्नर ने फरार आरोपी की तलाश करने का निर्देश दिया था। क्राइम ब्रांच ने आरोपी विनोद कुमार को पकड़नें के लिए पुलिसकर्मियों की टीम बनाई थी।

पुलिस टीम को पता चला था कि आरोपी का मूल गांव अछवर, जिला भदोही, उत्तर प्रदेश है। इसके बाद पुलिस वहां के मुखबिरों को सक्रिय किया था। पुलिस को मुखबिरों से सूचना मिली थी कि आरोपी नाम व पहचान बदलकर गांव आया है। इसके बाद क्राइम ब्रांच की टीम ने उत्तर प्रदेश के ज्ञानपुर पुलिस स्टेशन से संपर्क किया और आरोपी को गिरफ्तार कर लिया। क्राइम ब्रांच टीम ने आगे की जांच के लिए आरोपी को नालासोपारा पुलिस को सौंप दिया है। फिलहाल मामले की जांच नालासोपारा पुलिस कर रही है।



CS CamScanner
Scanned with OKEN Scanner

The Free Press Journal – Pg

# New project to reduce travel time: MBMC

**Suresh Golani**

MIRA BHAYANDAR

The Mira Bhayandar Municipal Corporation (MBMC) has chalked out an elaborate roadmap in the form of Home@20 – an ambitious futuristic project, which will cut down on travel time from the Western Express Highway to the city center to less than 20 minutes.

The MBMC has roped in a private agency, which is conducting a survey and will table a report containing ground realities and recommendations to address critical traffic issues and implement targeted improvements for enhancing commuting efficiency and safety of motorists and citizens.

The scheme focuses on five critical entry points into the twin-city with an emphasis on various factors including road-widening, targeted upgrades of adaptive signal control systems for real-time traffic management, one-way roads, congestion mitigation for enhancing smooth traffic flow and reducing bottlenecks. This is apart from geometric improvements aimed at realignment of junctions to facilitate smoother transitions.

Scanned with OKEN Scanner